दिनांक ०१/०२/२०२४

# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ३१/०१/२०२४ चे ००.०१ ते २४.०० वा.

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलिस स्टेशन गाडगे नगर अप.क्र. ११४/२०२४ कलम ३८० भादवी | फिर्यादीचे राहते घरी शेगाव आम्रपाली कॉलनी अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.३१.०१.२०२४ चे सकाळी ०९.००वा.दरम्याण दि.३१.०१.२०२४ चे सकाळी २१.२६वा | छत्रपाल सुखदेवराव ढोके वय ५४ वर्ष,व्यवसाय सिलेण्डर डिलेवरी ,रा. शेगाव आम्रपाली कॉलनी अमरावती | संकेत निरंजय नंदागवळी वय १८ वर्ष रा.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी व आरोपी हे एकमेकाचे नातेवाईक असुन नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी आरोपी हे फिर्यादीचे घरी आले तेव्हा फिर्यादी यांची पत्नी घरावरील वरच्या मजल्यावर कामा निमित्य वर गेली होती व मुलगा संडासला गेला होता तेव्हा आरोपी हा घरातील पंलगावर बसला होता व मी घरामध्ये किचनमध्ये चहा बनवुन आरोपीला चाहा दिला दोघे जन चहा पिलो व घरातिल खाली सिलेण्डर ऑटोमध्ये भरले तेव्हा तो ऑटो जवळ बाहेर उभा होता मी त्याला म्हटले गँसचा घरातुन ड्रेस घालुन येतो असे म्हणुन मी घरात गेलो घरातील ड्रेस घातला तर माझ्या पँटच्या उजव्या खिश्यामध्ये सिलेण्डर डिलीवरीचे पैसे १८,२००/रु.दिसले नाही बाहेर आलो तर आरोपी हा ऑटो जवळुन पळुन गेला त्याने माझ्या खिश्यातील १८,२००/- रु.चोरुन नेले असुन त्यामध्ये नोटा ५००*३२-१६०००/रु.,२००*७-१४००रु.व १००*८-८००/-रु. असा एकुन १८,२००/-रु.नगद चोरुन नेले आहे त्याचा आज दिवसभर शोध घेतला मिळुन आला नाही म्हणुन त्याच्या विरुध्द कार्यवाही होण्या करीता रिपोर्ट देत आहे.अशा फिर्यादीच्या सागितल्या प्रमाणे जबानी रिपोर्ट सदरचा गुन्हा दाखल |

## ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे. नांदगाव पेठ अप.न. ३४/२०२४ कलम १३९ भा.वि.का | अग्रवाल पेट्रोलपंप जवळ | दि. २९/०१/२४ चे २१.३० वा. दि.३१/०१/२४ चे १९.०५ वा | गजानन ज्ञानेश्वर बेहरे वय ४० वर्ष रा. नांदगाव पेठ | सचिन लोखंडे वय ३५ वर्ष रा. अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की नमुद घ.ता. वेळी व ठिकाणी दि. २९/०१/२४ चे रात्री अंदाजे ०९.३० वा. कोणी अज्ञात ट्रकमुळे मोर्शि रोड वरील अग्रवाल पेट्रोलपंप समोरील महावितरण कंपनीचे लघुदाब विधुत वाहीणीचे तार तुटले होते. माहीती घेतली असता सदर आरोपी याने त्याचे ट्रक क्र. एम. एच २६ ऐ.डी. २३४४ ने तार तोडल्यामुळे महावितरण कंपनीचे अंदाजे ४०००/ रु.चे नुकसान झाले आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पोलिस स्टेशन गाडगेनगर अमरावती शहर अप.क्र. ११३/२०२४ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम | जिपप्रशिक्षण विभाग कार्यालय परिसरातील श्री तायडे यांचे चहा कॅन्टींन | गु.घ.ता.वेळ दि. ३१.०१.२०२४ चे ११.०१ ते ११.३० वा. माहीती दाखल ता.वेळ दि.३१.०१.२० २०२४चे १९.१५वा | नरेश विठ्ठलराव तेटु रा.नवाथे नगर बडनेरा रोड अमरावती | एक महीला | हकिकत अशा प्रकारे आहे की यातिल फिर्यादी सेवानिवृत शिक्षक असुन ते सेवानिवृत्त दि.३१/०१/२०२३ रोजी सेवानिवृत्त झाले असुन त्यांचे गटविमा योजना जी आय एस चे १,९०,८४६ रुपये एवढा जमा होता सदर रक्कम ही सेवानिवृत्त नंतर ६ महिन्यातचे आत सदर रक्कम मिळायला पाहीजे होती परंतु फिर्यादीस मिळाली नसल्याने ते विचारपुस करणे करीता प्राथमिक जिल्हा शिक्षणधिकारी कार्यालय प्राथमिक जिल्हा अमरावती कार्यालयात जावुन त्यांनी तेथे जावुन कनिष्ठ सहाय्यक एक महीला यांना भेटुन त्यांना परिचय देवुन गटविम्याची रक्कम लवकर मंजुरी साठी पाठविण्याची विनंती केली असता त्यांना फि स म्हटले कि मला तुमच्या १,९०,८४६ रुपये बिलाच्या १ टक्के नुसार १९००/- रु.होतात तुम्ही मला २०००/रु.देवुन टाक तुमचे काम लवकर करुन देते असे म्हटल्याने फिर्यादी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती यांना दि.०४/०१/२०२४रोजी पो.नि. पंधरे यांच्या कडे तक्रार केल्याने सदर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे दि.३१/०१/२०२४ रोजी सापळा रचुन पंचासमक्ष आरोपी यांनी २०००/- रु.च्या पावडरलावलेल्या २०००/- चे प्रतेकी ५००/रु.च्या.४नोटा पंचा समक्ष स्विकारल्यावरुन फि.चे जबानी रिपोर्ट वरुन व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी संगनकावर टाईप करून आणलेल्या तक्रारी वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | खोलापुरी गेट 27/2024 कलम 294, 506(ब) , 427, 341, 34,भादवि सह कलम 4/25 आर्म अँक्ट | संभाजी चौक महाजनपुरा अमरावती | 31/01/2024 चे 17/00 वा ते 17/15 वा सुमारास<br><br>दाखल ता वेळ 31/01/2023 चे 19/45 वाजता | कार्तीक अनिल राजगुरे वय 24 व्यवसाय खाजगी नोकरी रा गणपती मंदीराजवळ , तारखेडा अमरावती | गोलु पार्डीकर व मयुर भगत, साहील हिरपुरकर सर्व रा महाजनपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की,नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे जावायाची फोरव्हीलर गाडी क्र एमएच 27-बी ई -6014 कोस्कवेगनने सव्हीसिंगकरुन संभाजी नगर महाजनपुरा येथुन जात असतांना नमुद ठिकाणी यातील आरोपी हे फि चे गाडीचे समोर तलवारी घेवुन आले व फि ला अडवुन गोलु पार्डीकर याने जोरजोरात मादरचोद कुठे जातो भाई रस्त्यावर उभा आहे ,भोसोडीच्या गाडी पलटव नाहीतर खतम करुन टाकील असे बोलुन गाडीवर जोरजोराने तलवारी मारल्या त्यामुळे गाडीचे समोरील काच फुटुन अंदाजे 25000/रुचे व दोन्ही साईडचे बी पिलर चे व मागील डिक्कीचे असे एकुन 35000/रु चे गाडीचे नुकसान केले तसेच फि चे मागुन विलास हरिचंद्र डोईफोडे वय 57 रा रुख्मिना नगर हे सुध्दा त्याची फोरव्हीलर क्र एमएच 27- बी व्ही -4260 ग्रॅंड आय टेन ने संभाजी नगर महाजनपुरा येथुन त्याच ठिकाणावरुन जात्‌ असतांना त्यांच्या सुद्दा गाडीचे नमुद आरोपीतांनी दोन्ही साईडचे बी पिलर व वाहनावर तलवारी मारुन फोडुन अंदाजे 40000/- रुचे नुकसान केले असा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | खोलापुरी गेट 28/2024 कलम 452, 427, 34 भादवि | फि चे राहते घरी हनुमान नगर अम | दि 31/012024 चे 16.30<br><br>दाखल- 31.01.2024 चे 20.38 | शुभम अशोकराव ढोले वय 29 वर्ष रा हनुमान नगर अमरावती | 1-पवन वानखडे रा माळीपुरा व<br>2- अनंता नावाचा इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की,नमुद घटना तावेळी वठिकाणी फिर्यादी हे कामावरुन घरी परत आले असतांना त्यांचे घराची मुख्या दरवाजा तुटलेला दिसला तसेच किचनचा दरवाजा तुटलेला दिसला वरुन फि ने सीसीटिव्ही फुटेज पाहीले असता त्यामध्ये दुपारी 3.30 वा नमुद आरोपी दरवाजा तोडुन घरात जावुन घरातील किचनचा दरवाजा तोडुन सामानाची तोडपोड केली व नुकसान केले असे दिसुन आले असा जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | वलगाव मर्ग क्र. 07/2024 कलम 174 जा.फौ.प्रमाने दाखल. | वायगाव शेत शिवार | योगेश गणपतराव जवंजाळ वय 52 वर्ष रा.वायगाव ता.जि.अमरावती. | सौरभ योगेशराव जवंजाळ वय 23 वर्ष रा.वायगाव ता.भातकुली.जि .अमरावती. | शेतात पडुन डोक्याला अंतर्गत मार लागुन मृत्यु | हकिकत अशा प्रकारे आम्ही सपोउपनि बलराम भास्कर ब.न.916 पोस्टे वलगाव अमरावती शहर. रोजी 09/00 वा.ते 21/00 वा.तपास मदत ड्युटी असतांना पोलीस पाटील वायगाव यांनी फोनव्दारे माहीती दिली कि,एक ईसम शेतात पडुन आहे.अशा माहीती वरुन स्टेडा ला नोंद घेवुन घटनास्थळी गेलो असता एक ईसम शेतात खाली पडलेला दिसला त्यांच्या जवळ त्यांचे मुलगा नामे सौरभ योगेश जवंजाळ वय 23 वर्ष हा हजर होता.घटनास्थळ पंचनामा करुन सदर ईसमास ईलाजा करीता ईर्विन दवाखाना येथे नेले असता.डॉ.सा.यांनी तपासुन मृत घोषीत केले वरुन मृतक नामे योगेश गणपतराव जवंजाळ वय 52 वर्ष रा.वायगाव ता.भातकुली जि.अमरावती यांचे पि.एम करण्यात आले असुन प्रेत अंत्य विधिकरीता मृतकाचे मुलगा नामे सौरभ योगेश जवंजाळ यांचे ताब्यात देण्यात आले.तसेच मृतकाचे मुलाचे बयान घेतले असता.बयानात सांगतात कि,माझे वडील हे लागवडीच्या शेतात पाणी देण्या करीता गेले होते परंतु संध्या काळी घरी परत न आल्याने आम्ही वडीलांचे आजु बाजुच्या शेतात व परीसरात शोध घेतला असता.फिर्यादिचे वडील (मृतक हा वायगाव शेत शिवारात पडुन डोक्याला अंतर्गत मार लागल्याने मृत झाला असावा आमची कोणा विरुध्द तक्रार नाही व आमचा कोणावर संशय नाही.अशा मृतकाचे मुलाचे बयाना वरुन सदर चा मर्ग दाखल | तपासी अधिकारी – पोउपनि विश्वजीत सरनाईक पोस्टे वलगाव अमरावती. |

## जुगार

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपुरी गेट | अप नं ३४/२०२४ कलम १२ अ मजुका भादवी | अकबर नगर नाल्या जवळ अमरावती | ३१/०१/२०२४ चे १३/०५ते १३/३० वा | दि ३१/०१/२०२४ १५/५८ वा | सरतर्फे पोउपनि सचिन माकोडे पोस्टे नागपुरी गेट अम | १ शेख फिरोज शेख हारून वय २८ रा ताज नगर नर अमरावती ,२ रहेमत खान मुस्तु खान वय ३१ ताज नगर हाजरा नगरअमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि,पेटोलीग करिता असताना मिळालेल्या गुप्त माहीती वरून घटना ता वेळी ठिकाणी पंचनाम्यातील नमुद पंचासह जावुन जुगार खेळणीनारे इसमावर रेड जागीच पकडुन पंचासमक्ष त्याचे नाव गाव विचारून त्याची अंगझडती घेतली असता त्याने आपले नाव १ शेख फिरोज शेख हारून वय २८ रा ताज नगर नर अमरावती ,२ रहेमत खान मुस्तु खान वय ३१ ताज नगर हाजरा नगरअमरावती असे सांगुन त्याचे ताब्यातुन वरली मटका जुगाराचे त्याचे ०१ ते १० आकडे पेनाने लिहलेल्या कागदी चिठ्या व जुगार खेळाचे नगदी ७३०/रु व एक डॉट पेन कि १०/रु ताब्यातुन वरली मटका चिठ्या १ ते १० आकडे लिहलेल्या चिठठ्या व नगदी ७४०/रु असा एकुण जुगार माल मिळुन आल्याने घटनास्थळी जप्ती पंचनामा कार्यवाही करून जप्त केला यातील नमुद आरोपीचे कुत्य कलम १२ अ महाराष्ट जुगार प्रतिबंध अधिनियम प्रमाणे होत असल्याने अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## प्रोव्हीशन

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | अप क्र .८८/२०२४ कलम ६५(ई) मदाका | ग्राम बोडणा ता.जि. अमरावती | दि.३१/०१/२०२४ चो ०९.४५ वा | दा.ता.वेळ दि.३१/०१/२०२४ चे १२.१५ वा | पोहेकॉ योगेश श्रीवास ब.नं.1015 पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | गणेश पुणाजी जाधव वय ४३ वर्ष रा. ग्राम बोडणा ता.जि. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो.स्टाफ सह पो.स्टे. हद्दित पेट्रोलींग करित असतांना गुप्त बातमी दाराच्या माहीतीवरुन सदर आरोपी वर प्रोव्ही. रेड केली असता त्याचे ताब्यातुन 8 लिटरगावठी हातभट्टी दारु एकुण कि.अं.1600/-रु.चा प्रोव्ही माल पंचा समक्ष जप्ती पंचनाम्या प्रामाणे जप्त करुन सदर आरोपीचे कृत्य कलम 65(ई) मदाका. प्रमाणे होत असल्याने त्याचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती | अप.क्र. ११२/२०२४ कलम ६५(ई) म.दा.का. | कृष्णा नगर गल्ली नं. ५ अमरावी | दि. ३०.०१.२०२४ चे २२.१० वा | दि. ३१.०१.२०२४ चे ००.४० वा. | पो.हे.का.सुभाष पाटील ब.न. १२८० पो.स्टे.गाडगेनगर अम | पवन रामचंद्र करोची रा.समाधान नगर अम. , मयुर भरत शिंदे वय २८ वर्ष.रा. रुक्मिणी नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी हे पोलीस स्टाफ सह पो.स्टे.हद्दीत जुगार रेड करणेबाबत पेट्रोलिंग करती असताना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक बातमीवरुन यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी प्रो.रेड केले असता नमुद आरोपी हा पांढरे रंगाचे गाडी क्र. एम.एच -२७-एडब्ल्यु-९८५० अकटीव्हा गाडीवर अवैद्यरित्या दारु घेवुन जात असताना पो.स्टाफचे मदतीने जागीच पकडले व त्याचे नाव गाव विचारुन त्याच्या ताब्यातील पृष्ठाच्या खोक्यामध्ये देशीदारु बॉबी संत्रा १८०मीली च्या ९६ नग काचेच्या बांटल कि.अं. ७३००/- रु. चाल माल व गाडी क्र. एम.एच -२७-एडब्ल्यु-९८५० अकटीव्हा किं.अं. २५०००/- रु. चा माल असा एकुण ३२,३०० /- रु.चा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. |